**राज्यशासन पुरस्कृत *महाजल* व केंद्र पुरस्कृत *स्वजलधारा* योजनेत ग्रामपंचायतींनी प्रस्ताव सादर करण्याबाबत व योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.७४(२)/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक २ मे,२००५**

वाचा: (१) शासन निर्णय, पा.पु.वस्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै २०००.
(२) शासन निर्णय, पा. पु. व स्व. वि.,क्रमांक ग्रापापु- १००१/ प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर २००१.
(३) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु- १००४/ प्र.क्र.२४४/पापु-०७, दिनांक १८ जानेवारी २००५.
(४) शासन शुध्दीपत्रक, पा.पु. व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००४/प्र.क्र.२४४/पापु-०७, दिनांक ८ फेब्रुवारी २००५.
(५) शासन शुध्दीपत्रक, पा.पु. व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.१३/पापु-०७, दिनांक १८ फेब्रुवारी २००५.
(६) शासन निर्णय , पा.पु. व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.७४(१)/पापु-०७, दिनांक ३० एप्रिल २००५.

परिपत्रकः-

२७ जुलै, २००० पासून राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छतेचे नवे मागणी आधारित समूह सहभागाचे धोरण अंमलात आले आहे. त्यानुसार, पाणी पुरवठा योजनेच्या कोणत्याही बाबीसाठीचा निधी, जर एका गावाची योजना असेल तर थेट ग्रामपंचायतींला उपलब्ध करुन दिला जातो. यामध्ये सध्याच्या योजनांच्या स्त्रोतामध्ये पाणी कमी पडत असल्यास त्यांचे बळकटीकरण, नव्या स्त्रोताचा आवश्यकतेनुसार विकास, अस्तित्वातील योजनेत भांडवली स्वरुपाची गुंतवणुक करुन त्याचे पुनरुज्जीवन अथवा आवश्यक असल्यास नवीन योजना, त्यांची विविध उपांगे यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. एकापेक्षा जास्त **ग्रामपंचावतीसाठी** संयुक्त योजना करावयाची असल्याने ती जिल्हापरिषदेने अथवा

योजनेत सामाविष्ट सर्व ग्राम पंचायतीच्या संयुक्त ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हापरिषदेच्या मान्यतेने करण्यास मुभा आहे.

२. योजनेच्या प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक भांडवली खर्चाची व त्यावर अंदाजपत्रक व आराखडे (Plan & Estimates) करणेसाठी २%, तांत्रिक सल्लगार नेमणे ५ % व प्रशासकीय खर्च २% अशा एकुण १०० रुपयाच्या प्रत्यक्ष कामापोटी १०९ रुपये निधी विचारात घेवून त्यांच्या ९०% निधी (सर्वसाधारण भागाकरिता) किंवा ९५ % निधी (आदिवासी व मागासवर्गीय बहुल भागाकरिता राज्य पुरस्कृत **महाजल** योजनेत) राज्यशासन उपलब्ध करुन देते.

३. निधी थेट ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन देण्यात येतो. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ४९ अन्वये ग्रामसभेच्या सहमतीने गठीत ग्रामपंचायतीच्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने** योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावयाची आहे, तर याच कलमान्वये गठीत ग्रामपंचायतीच्या **ग्राम सामाजिक लेखा परिक्षण समितीने** योजना योग्य प्रकारे राबविली जाण्याच्या दृष्टीने संनियंत्रण करावयाचे आहे. योजनेबाबत निर्णय घेताना ग्रामसभेला **किमान ४०% उपस्थिती अनिवार्य** आहे. लोकवर्गणी ही ग्रामस्थांकडूनच **रोखीने** अथवा **श्रमदानाने** अथवा योजनेत आवश्यक **ज्ञानदान** किंवा **वस्तूदान** या स्वरुपात जमा करावयाची आहे. ज्याला काम द्यावयाचे आहे त्या कंत्राटदाराकडूनच किंवा गावातील २-३ श्रीमंत मंडळींनी लोकवर्गणी जमा करावयाची नाही. कारण, लोक वर्गणी जमा करण्यामागे लोकांमध्ये योजनेप्रती आपुलकीची भावना निर्माण व्हावी, योजना आपली वाटावी, योजनेची मालकीसुध्दा गावाची आहे याची जाणीव व्हावी, ती शाश्वतरित्या चालवावी अशी संकल्पना आहे.

४. परंतु, जागतिक बँक प्रणित **जलस्वराज्य प्रकल्प** व जर्मन शासन पुरस्कृत **आपलं पाणी** या प्रकल्पात जशी होती तशी, केंद्र शासन पुरस्कृत **स्वजलधारा** व राज्य शासन पुरस्कृत किमान गरजा कार्यक्रमांतर्गत **महाजल** या पाणी पुरवठा योजनेंतर्गत अशा तऱ्हेने ग्राम स्तरावर संपूर्ण आवश्यक प्रक्रिया होत नाही, ठरलेल्या अटीचे पालन होत नाही व गावातील सर्वसामान्यांना योजनेची काही माहिती नसतांना ती अपारदर्शक पध्दतीने राबविण्याचा प्रयत्न करतात अशा काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. संबंधित जिल्हापरिषदेच्या यंत्रणाही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे या बाबींकडे दुर्लक्ष करतात असेही निदर्शनास आले आहे.

५. वस्तुतः ग्रामस्थांनी त्यांच्या स्तरावर योजना व्यवस्थितपणे राबविण्यास्तव त्यांची क्षमता बांधणी होण्यासाठी, त्यांच्या पुढाकारावर व कार्यकक्षेवर कोणताही हस्तक्षेप न करता सहाय्यकर्ता या नात्याने जिल्हा परिषदेला पूर्वीपेक्षाही महत्वाची व जादा जबाबदारीची भूमिका या कार्यक्रमात बजावयाची आहे.

६. यामुळे, जागतिक बँक पुरस्कृत **जलस्वराज्य** प्रकल्पात व जर्मन बँक पुरस्कृत **आपलं पाणी** प्रकल्पातील अटी ज्या लोकांचा खरा सहभाग घेण्यासाठी घातल्या आहेत त्या फार जाचक व कालापव्यय करणाऱ्या आहेत अशी जनमानसात जाणीवपूर्वक भावना निर्माण करुन **स्वजलधारा** व **महाजल** योजनेत गावाने फक्त कागदोपत्री सर्व प्रक्रिया पूर्ण केल्याचे दाखवून, रोखीने १०% जमा करुन, बरेचदा कंत्राटदारालाच हा निधी जमा करण्यास प्रवृत्त करुन **"केवळ बांधकाम"** म्हणून योजना हातात घेण्यात येते. यातून प्रत्यक्ष व शाश्वत पाणी पुरवठा बरेचदा होईल किंवा नाही याची सुध्दा शंका असते.

७. शासनाने ७३ व्या घटना दुरुस्तीतील तरतूदींचा विचार करुन **"लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग"** या धोरणाचा अंगीकार करुन या नव्या मागणी आधारित लोकसहभागाच्या धोरणाचा पर्याय स्विकारला आहे. सबब ज्या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली आहे तो उद्देश पूर्ण व्हावा यास्तव ग्रामस्तरावर व जिल्हा परिषद स्तरावर सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकदा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी विहीत केलेल्या सर्व अटींचे काटेकोर पालन करावे :-

अ) **ग्रामपंचायत स्तरावरुन प्रस्ताव सादर करतांना करावयाची आवश्यक पूर्तता :**

१) या योजनेत गावाची निवड होण्यासाठी संबंधित गावच्या ग्रामसभेच्या सहमतीने रितसर अर्ज जिल्हा परिषदेकडे करणे आवश्यक आहे.

२) वाड्या वस्त्यांची ग्रामसभा झाल्यानंतर महिलांची स्वतंत्र ग्रामसभा व त्यानंतर सर्वसाधारण ग्रामसभा या पध्दतीची ग्रामसभा झाली पाहिजे.

३) नवीन योजनेची मागणी करण्यापूर्वी गावातील जुनी योजना, त्याची सर्व उपांगे गावाने ताब्यात/हस्तांतरित करुन घेतली पाहिजे व त्याचा वापर होत असावा.

४) गावाने जिल्हा परिषदेकडे अर्ज सादर करताना योजनेसाठी दिलेला पर्याय हा किमान खर्चाचा असावा.

५) लोकवर्गणी ही गावातील लाभार्थ्यांकडूनच जमा केलेली असावी. मात्र, ती कमी जास्त प्रमाणात आर्थिक परिस्थितीनुसार लाभधारकांकडून घेता येईल.

६) शेतमजूर व गावातील गरीब व्यक्तींपैकी श्रमदान करणाऱ्यांचा सहभाग हा पैशात रुपांतरित केल्यावर रोख वर्गणी देणाऱ्यांपेक्षा जर जास्त होत असेल तर जास्तीच्या श्रमदानाचे मूल्य मजूरी त्यांना म्हणून परत देण्यात यावे.

७) कंत्राटदाराकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे लोकवर्गणी जमा करु नये. ही बाब योजनेच्या अंमलबजावणीच्या पूर्वी किंवा अंमलबजावणी काळात अथवा योजना पूर्ण झाल्यावर केव्हाही निदर्शनास आल्यास **याला जबाबदार असणाऱ्या सर्व व्यक्तींवर** नाईलाजाने कार्यवाही करावी लागेल.

८) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समिती या दोन्हीही मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारित कलम ४९ अन्वये गठीत झालेल्या असल्या पाहिजेत. यामध्ये दोन्ही समित्यांतील सदस्य पूर्णतः वेगवेगळे असले पाहिजेत व त्यांची निवड ग्रामसभेतच झाली पाहिजे.

९) ग्रामसभेने जेवढे अधिकार दिले असतील तेवढेच अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समितीने वापरले पाहिजेत.

१०)गावाने पाणी लेखापरिक्षण व पाणी अंदाजपत्रक सहभागी पध्दतीने करुन घेणे आवश्यक आहे.

११)गावाने योजनेसाठी जिल्हा परिषदेकडे अर्ज सादर करताना ग्रामसभा घेवून त्या ग्राम सभेत घेतलेल्या पुढील निर्णयांच्या ठरावाची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे :-

अ) सिंचनासाठी **गावठाणात** विंधन विहिर घेण्यात येणार नाही.

ब) गाव १००% हागंदारीमुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल व योजनेचा दुसरा हप्ता मिळण्यापूर्वी गाव १००% हागंदारीमुक्त करण्यात येईल.

क) योग्य (राज्य शासनाने ठरवून दिलेल्या किमान दरापेक्षा कमी नसेल एवढी) पाणीपट्टी लावून त्याची वसुली करुन योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचा १००% खर्च वसुल केला जाईल व योजनेचा शेवटचा हप्ता मिळण्यापूर्वी ३ महिन्याची पाणी पट्टी लाभार्थ्यांकडून आगाऊ वसूल केली जाईल.

१२) तसेच सोबत जोडलेल्या **तपासणी सूचीमधील** संपूर्ण माहिती भरुन ती प्रस्तावा सोबत सादर करणे आवश्यक आहे.

१३) प्राप्त होणारा निधी ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा समितीच्या नावाने स्वतंत्र बँक खाते उघडून त्यातच ठेवला पाहिजे व यातून खर्च करताना व तो काढताना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता

समितीच्या किमान दोन सदस्याच्या सहीने काढता येईल. परंतु, त्यापैकी किमान एक सदस्य महिला असणे अनिवार्य आहे.

१४) गावात आलेला निधी व त्यातून होणारा खर्च हा काम सुरु असलेल्या ठिकाणी व ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर दर आठवडयाला लिहिला पाहिजे. प्रत्येक ग्रामसभेत त्याची माहिती दिली पाहिजे व इतर पारदर्शक मार्गाने सर्व खर्च कोणत्याही वेळेस सर्व ग्रामस्थांना उपलब्ध करुन दिला पाहिजेत

१५) हिशोब ठेवण्यासाठी प्रशिक्षित ग्रामस्थ उपलब्ध करुन सर्व हिशोब व्यवस्थित लिहिला जात आहे याची दक्षता घेतली पाहिजे.

१६) हिशोबाचे लेखा परीक्षण लेखापालांकडून ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करुन घेतले पाहिजे. त्यानंतर शेवटचा ५% हप्ता अदा करण्यात येईल.

१७) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत देयके अदा करताना रु. १००० अथवा त्यावरील रक्कम **रेखांकित धनादेशा** व्दारे अदा केली पाहिजे. फक्त कामावर आलेल्या मजूरांची मजूरी देताना ती रोखीने देण्याचा अपवाद राहिल.

१८) योजनेची देयके कंत्राटदाराला अदा करतांना किंवा माल खरेदीचे बील अदा करतांना ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने रक्कम अदा करण्याच्या आदेशावर ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समितीची सहमती (endorsment) घेतली पाहिजे.

१९) गावातील योजनेच्या कामाचा अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठवितांना त्यावर ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या अध्यक्षांची सही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने घेणे आवश्यक आहे व तो अहवाल ग्रामपंचायतीला सही शिक्क्यानिशी पाठविला पाहिजे.

२०) अंदाजपत्रक व आराखडे (Plan & EstimateS) तयार करताना शासनाने ठरवून दिलेल्या पध्दतीने ती तयार केली पाहिजेत. कंत्राटदार नेमावयाचे असल्याने तो पारदर्शक पध्दतीने नेमला पाहिजे.

२१) माल खरेदी ग्रामपंचायत करणार असल्यास मालाची प्रत आय.एस.आय. मार्क असावा. खरेदी सुध्दा पारदर्शक पध्दतीने केली पाहिजे.

२२) तांत्रिक सल्लागार नेमतांना सक्षम तंत्रज्ञालाच नेमले पाहिजे व यामध्ये आवश्यकतेनुसार स्पर्धा करुन नेमणूक दिली पाहिजे.

२३) जिल्हा परिषदेने योजना मंजूर करताना ज्या विशिष्ट टप्प्यावर जिल्हा परिषदेचे पर्यवेक्षीय तंत्रज्ञानाकडून तपासणी करण्यात येईल अशी अट घातली असेल त्या टप्प्यावर जिल्हा परिषदेकडून तपासणी झाल्यावर पुढील कामे करण्यात यावी. मात्र, जिल्हापरिषदांचा पर्यवेक्षीय तंत्रज्ञ कळवूनही व त्याला सुचना मिळूनही १५ दिवसात आला नाही व तपासणी केली नाही तर पुढील काम सुरु करावे व तसा अहवाल त्वरित जिल्हापरिषदेला द्यावा.

२४) आवश्यक तेवढेच मटेरियल (साधनसामुग्री) खरेदी करावे. जी साधनसामुग्री खरेदी केली असेल त्याचे योग्य रजिस्टर ठेवले पाहिजे. त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली पाहिजे.

२५) गावाने नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराने प्रमाणित केल्यावरच कंत्राटदाराला देयके अदा करण्यात येतील.

२६) विकत घेतलेल्या मालाची प्रत आवश्यकतेनुसार प्रयोगशाळेतून तपासून घेण्यात यावी याचा खर्च २% प्रशासकीय खर्चातून भागवावा.

२७) अंदाजपत्रक व आराखड्या (Plan & Estimates) प्रमाणे देखभाल दुरुस्तीला येणाऱ्या खर्चाचा विचार करुन जो पाणी पट्टीचा दर निश्चित होत असेल तो दर गांवाने लावल्याचे आदेश काढले पाहिजेत. तो दर शासनाने ठरविलेल्या किमान दरापेक्षा (खर्च जरी कमी येत असला तरी) कमी असता कामा नये.

**ब) जिल्हापरिषद यंत्रणेची जबाबदारी :**

१) गावाची निवड शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापापु१००४/प्रक्र २४४/पापु०७, दि.१८ जानेवारी,२००५ व शासन शुध्दिपत्रक, पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापापु१००४/प्रक्र २४४/पापु०७, दि.८ फेब्रुवारी,२००५ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार खुल्या पध्दतीने व ग्रामसभेच्या सहमतीने अर्ज प्राप्त झाल्यावरच करावी. गावाच्या वतीने इतर वरिष्ठ अथवा पदाधिकाऱ्यांनी शिफारस केली असेल तरी त्यांचा संदर्भ देवून गावाकडून रीतसर मागणी अर्ज प्राप्त करुन घ्यावा व तो प्राप्त झाल्यावरच गुणानुक्रमाने गावांचा विचार करावा.

२) नवीन योजना देण्यापूर्वी गावाने जुनी योजना, त्याची सर्व उपांगे ताब्यात घेतली आहेत व त्याचा वापर होत आहे याची खात्री करावी.

३) गावाने सादर केलेला पर्याय किमान खर्चाचा आहे हे पहावे.

४) प्रस्ताव सादर करतांना जिल्हयाची आर्थिक तरतूद विचारात घेवून योजना मंजूर कराव्यात. योजनेचा प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक खर्च अधिक त्यांवर कमाल ९% रक्कम या पध्दतीने मंजूर होईल याची काळजी घ्यावी.

५) ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रक व आराखड्या (Plan & Estimates) मध्ये मागितलेले शासन सहाय्य ठरवून दिलेल्या निकषानुसार आहे व त्यात अनावश्यक जादा रक्कम वाढविलेली नाही याची खात्री करुन घेणे. आता जिल्हापरिषदेला एका गावाच्या योजनांना प्रशासकीय मंजूरी द्यावयाची नाही. कारण ती ग्रामसभा देणार आहे. ग्रामपंचायतीकडून प्राप्त प्रस्ताव तपासून त्याला आर्थिक निकषानुसार निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावयाची आहे.

६) योजना मंजूर करण्यापूर्वी अथवा सुरु असतांना आवश्यकतेनुसार खात्री करण्यासाठी गावात जावून तपासणी करणे, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्राम सामाजिक लेखा परिक्षण समिती याचे बरोबर सभा घेणे किंवा आवश्यकतेनुसार ग्राम सभा बोलावून प्राप्त अहवालानुसार अथवा अन्यथा सर्व तरतूदींची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली आहे याची खात्री करुन घेणे.

७) बांधकामाच्या विशेष टप्प्यावर गावात जावून तपासणी करणे. तसेच, कामे सुरु असताना वेळोवळो अचानक भेट देवून पहाणी करणे. गावाने नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराशी चर्चा करणे. काम बरोबर झालेले नसले तर त्वरित निर्णय घेवून ते सुधारणेस सांगणे व पुढील हप्त्याचा निधी त्रूटींची पूर्तता केल्यावर उपलब्ध करण्याच्या सूचना बँकेला देणे. मात्र यात अनावश्यक कार्यवाही करुन काम ठप्प होणार नाही याचीही काळजी घेणे आवश्यक आहे.

८) गावातील तपासणी करताना गैरव्यवहार लक्षात आल्यास ग्राम समाजिक लेखा परिक्षण समितीला त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना देणे. जर, ज्यांनी त्या सूचना पाळल्या नाहीत तर, पुढील **प्रशासकीय, फौजदारी व आर्थिक वसूलीची** कार्यवाही जिल्हापरिषद स्तरावर करण्यासाठी व्यवस्था करणे.

९) योग्य क्षमतेचे कंत्राटदार, सक्षम तांत्रिक सल्लगार व अंदाजपत्रक व आराखडे (Plan & Estimates) करणारे तज्ञ, पाणी स्त्रोत तपासणारे तज्ञ गावाला उपलब्ध व्हावे म्हणून पारदर्शक पध्दतीने त्यांचे पॅनेल तयार करुन ते गावांना उपलब्ध करुन देणे. जर या तंत्रज्ञानी योग्य काम केले

नाही, गावांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना काळया यादीत टाकणे व त्यांचेवर इतर कारवाई करणे.

१०)वेळोवेळी जिल्हा दर सूची (DSR) सुधारणे व ती सर्व संबंधितांना उपलब्ध करुन देणे.

११)सोबत जोडलेल्या तपासणी सूची प्रमाणे गावांनी सर्व बाबी केल्याची विहित पध्दतीने खात्री करुन घेणे.

१२)ग्रामपंचायतीने नवी योजना घेणेपूर्वी गावाचे पाणी लेखापरिक्षणात व पाणी अंदाजपत्रक सहभाग पध्दतीने करुन घेतले पाहिजे त्यानंतरच **पहिला हप्ता** अदा करावा.

१३)ग्राम सभेचे आवश्यक ठराव सोबत जोडले आहेत काय हे तपासावे.

१४)पहिला हप्ता देण्यापूर्वी ग्रामपंचायतीने शेतीसाठी बोअर घेण्यावर गावठाणात बंदी आणली पाहिजे व ती पाळली गेल्याची खात्री करुन पुढील हप्ते अदा करणे.

१५)प्रस्ताव सादर करताना केलेल्या ठरावानुसार गाव हागंदारी मुक्त केले आहे याची खात्री करुन **दुसरा हप्ता** गावास अदा करणे.

१६)या ठिकाणी जिल्हापरिषदेने ध्यानात ठेवावे की त्यांची भूमिका मागदर्शन व संनियंत्रण करण्याची आहे. कामाची संपूर्ण जबाबदारी व अधिकार हे गावाचे आहेत. कामात काही गडबड झाल्यास किंवा पैसे अपहार झाल्यास ग्रामपंचायत, ग्रामस्थ, निधी खर्च करणाऱ्या ग्रामस्तरीय पदाधिकाऱ्यांची व अधिकाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी आहे. मात्र संनियंत्रणाच्या ठरलेल्या टप्प्यावर जिल्हा यंत्रणेने तपासणी करुन आपली जबाबदारी व भूमिका पार पाडणे तेवढेच आवश्यक आहे. ती पार पाडली नाही तर ग्रामस्थांबरोबर संगनमताचा आरोप जिल्हा यंत्रणेवर होवू शकतो. म्हणून संनियंत्रणाची ठरलेल्या टप्प्यावरील आपली जबाबदारी जिल्हा यंत्रणेने स्पष्टपणे पार पाडणे आवश्यक आहे. यात काही त्रुटी दिसून आल्यास त्वरित मार्गदर्शन व सुचना करणे आवश्यक आहे. हे जिल्हा यंत्रणेने नियमितपणे व पारदर्शक पध्दतीने केल्यावरही गावात त्रुटी निदर्शनास आल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायतीची व त्या अंतर्गत गठीत विविध यंत्रणेची, पदाधिकाऱ्यांची व ग्रामस्तर अधिकाऱ्यांची राहील.

७. तरी यापुढे याच पध्दतीने **स्वजलधारा** व **महाजल** हया दोनही योजनांमध्ये गावांची निवड, प्रस्तावाची तपासणी, निधीची गावांना उपलब्धता व इतर अंमलबजावणी होईल या दृष्टीने सर्वांनी दक्षता

घ्यावी. हे सर्व नियम, निकष व अटी निधी वितरण पध्दत किमान गरजा कार्यक्रमाखालील प्राप्त **आदिवासी** उपयोजना व **विशेष घटक योजनेतही** पाळल्या जातील याची दक्षता घ्यावी. लोकसहभाग, लोकनिर्णय, जनसक्षमीकरण व लोकांनी पुढाकार घेवून, कृती करुन आपला प्रश्न शासनाच्या आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय सहाय्याने सोडवावा या दृष्टीने अंगिकारलेल्या या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी व पालन होईल याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(विश्वास धुमाळ)**
**शासनाचे प्रधान सचिव**

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

D:\BACKUP\WS\... \india jal wo scheme.doc

# ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी तपासणी सूची

( टिप :- ही तपासणी सूची ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या प्रत्येक प्रस्तावासोबत जोडावी व ती सुवाच्य हस्ताक्षरात भरावी, खाडाखोड करु नये. अनिवार्य कारणासाठी किरकोळ दुरुस्ती असल्यास, त्या ठिकाणी सही करुन प्रमाणित करावे )

## भाग - एक : सर्वसाधारण :

१ ज्या गावासाठी / वाडीसाठी योजना प्रस्तावित केली आहे त्या गावाचे / वाडीचे नाव व सेन्सस कोड (राज्य, जिल्हा तालुका व गावाचा कोड) : अ) गांव/वाडीचे नांव ____________
सेन्सस कोड ☐☐☐☐☐☐☐☐

ब) महसुली गावाचे नांव: ____________
सेन्सस कोड ☐☐☐☐☐☐☐☐

२ ज्या ग्रामपंचायतीअंतर्गत हे गाव / वाडी अंतर्भूत आहे त्या ग्रामपंचायतीचे नांव : ------------------------

३ तालुका : ------------------------

४ जिल्हा : ------------------------

५ सन २००१ च्या जनगणनेनुसार :--

अ) i) गावाची एकूण लोकसंख्या : पुरुष ☐☐☐☐☐☐☐ स्त्री ☐☐☐☐☐☐☐ एकुण ☐☐☐☐☐☐☐

ii) गावातील एकूण कुटुंबाची संख्या : ☐☐☐☐☐ कुंटुबे

iii) गावातील एकूण घरांची संख्या : ☐☐☐☐☐ घरे

ब) i) गावातील अनुसूचित जातीची लोकसंख्या : पुरुष ☐☐☐☐☐☐☐ स्त्री ☐☐☐☐☐☐☐ एकुण ☐☐☐☐☐☐☐

ii) अनुसूचित जातीतील कुटुंबांची संख्या ☐☐☐☐☐ कुंटुबे

iii) अनुसुचित जातीतील घरांची संख्या ☐☐☐☐☐ घरे

क) i) गावातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या : पुरुष ☐☐☐☐☐☐ स्त्री ☐☐☐☐☐☐ एकुण ☐☐☐☐☐☐

ii) अनुसुचित जमातीतील कुटुंबांची संख्या : ☐☐☐☐☐ कुटंबे

iii) अनुसुचित जमातीतील घरांची संख्या : ☐☐☐☐☐ घरे

ड) i) अनुसुचित जाती / जमातीची मिळून एकुण लोकसंख्या : ☐☐☐☐☐

ii) गावातील एकुण लोकसंख्येशी त्याची टक्केवारी : ☐☐☐ • ☐☐ %

## भाग - दोन : धोरणात्मक पुर्तता :

६ अ) संबंधित गावात मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारित कलम ४९ नुसार "ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती" गठीत करण्यात आली आहे काय ? : होय / नाही

ब) उत्तर होय असल्यास, ग्रामसभेचा ठराव क्रमांक व दिनांक : ठराव क्रमांक : ____ दिनांक : __ / __ / ____

७ शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर २००१ नुसार संबंधित गावातील / वाडीतील लाभार्थ्यांची / महिलांची स्वतंत्र सभा घेऊन, नंतर ते गांव/वाडी ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात अंतर्भूत आहे त्या संपुर्ण गावाची ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. त्यानुसार

अ) योजनेच्या निवडीसाठी संबंधित गावातील / वाडीतील लाभार्थ्यांची स्वतंत्र सभा ग्रामसभेपुर्वी घेण्यात आली होती काय ? : होय / नाही

ब) उत्तर होय असल्यास, सभेच्या बैठकीचा ठराव क्रमांक व दिनांक : ठराव क्रमांक : ____ दिनांक : __ / __ / ____

क) सर्वसाधारण ग्राम सभेपुर्वी महिला मतदारांची स्वतंत्र सभा घेण्यात आली होती काय ? : होय / नाही

ड) उत्तर होय असल्यास, सभेच्या बैठकीचा ठराव क्रमांक व दिनांक : ठराव क्रमांक : ____ दिनांक : __ / __ / ____

इ) त्यानंतर ग्रामसभा घेण्यात आली होती काय ? : होय / नाही

फ) उत्तर होय असल्यास, ग्रामसभेच्या बैठकीचा ठराव क्रमांक व दिनांक : ठराव क्रमांक : ____ दिनांक : __ / __ / ____

ग) दिनांक ३/९/२००१ च्या शासन निर्णयातील नमुन्यात ग्राम सभेच्या ठरावाची प्रत जोडली आहे काय ? : होय / नाही

## भाग-तीन : अस्तित्वातील योजनांची माहिती :

८ संबंधित गावात / वाडीत अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा व योजनांचा तसेच त्यांच्या सद्यस्थितीबाबतचा तपशील द्यावा (आवश्यकतेनुसार माहिती स्वतंत्रपणे या तपासणीसूचीस जोडावी) :
- i) साध्या विहिरी : ---------
- ii) विंधण विहिर (हातपंप) : ---------
- iii) लघू नळ पाणी पुरवठा योजना : --------
- iv) नळ पाणी पुरवठा योजना : --------
- v) इतर सोयी : --------

९ अ) अस्तित्वातील स्त्रोतांपासून मिळणारा एकुण पाणी पुरवठा : ☐☐☐☐ लिटर्स

ब) प्रती दिन प्रती माणशी उपलब्ध पाणी पुरवठा
- साधारणतः : ☐☐ लिटर्स
- उन्हाळयात : ☐☐ लिटर्स

क) गावातील खाजगी नळ जोडण्या व सार्वजनिक नळकोंडाळ्यांची संख्या :
- १) नळ कोंडाळी संख्या ☐☐☐
- २) घरगुती जोडण्या संख्या ☐☐☐
- ३) बिगर घरगुती जोडण्या संख्या ☐☐☐

१० अ) अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांची देखभाल कोण करते ? : ____________

ब) त्यांचा वार्षिक देखभाल व दुरुस्तीचा खर्च किती आहे ? : रुपये ☐☐☐☐☐☐☐

क) i) गावात पाणी पट्टी वसुल केली जाते काय ? : होय ☐ नाही ☐

ii) असल्यास, वार्षिक मागणी (थकबाकी वगळून) किती व वसुली किती ? : मागणी रु ☐☐☐☐☐☐
वसुली रु. ☐☐☐☐☐☐

iii) नसल्यास, देखभाल व दुरुस्तीचा खर्च कसा भागविला जातो ? तपशील द्यावा. : ------------------------------

ड) पाणी पट्टीची एकूण थकबाकी किती आहे ? : रुपये ☐☐☐☐☐☐☐

## भाग-चार : प्रस्तावित योजना

११ अ) गावासाठी / वाडीसाठी प्रस्तावित केलेली योजनेचे स्वरुप : नळ पाणी पुरवठा योजना/विंधण विहिर/साधी विहिर/इतर (तपशीलासह) (आवश्यकतेनुसार माहिती स्वतंत्रपणे या तपासणी सूचीस जोडावी)

ब) प्रस्तावित योजना टिकाऊ व सर्वात कमी किंमतीचा पर्याय आहे, याची ग्राम सभेने खात्री केली आहे काय ? : होय ☐ नाही ☐

क) योजनेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च लाभार्थ्यांना परवडेल याची खात्री ग्रामसभेने केली आहे काय ? : होय ☐ नाही ☐

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | अ) प्रस्तावित योजनेमुळे गावाचा / वाडीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटणार आहे काय ? | : | होय / नाही |
| | ब) नसल्यास, सदर प्रस्ताव का सूचविण्यात आला त्याचा सकारण तपशील द्यावा : | : | ____________ |
| १३ | अ) प्रस्तावित योजनेचा स्त्रोत खात्रीलायक व टिकाऊ आहे काय ? | : | होय / नाही |
| | ब) योजनेमध्ये योजनेचा उद्‌भव बळकटीकरणासाठी करावयाच्या उपाययोजनांचा समावेश आहे काय ? | : | होय / नाही |
| | क) नसल्यास कारणे द्यावी / असल्यास तपशील द्यावा | : | |
| १४ | अ) प्रस्तावित योजनेची अंदाजित किंमत | : | रु. [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] (अक्षरी रुपये..............................) |
| | ब) योजना आखणीचे प्रकल्पित वर्ष कोणते आहे ? | : | वर्ष [ ][ ][ ][ ] |
| | क) आखणीच्या प्रकल्पित टप्प्यातील लोकसंख्या किती आहे ? | : | [ ][ ][ ][ ] व्यक्ती |
| | ड) प्रकल्पित लोकसंख्येकरीता योजनेचा दरडोई भांडवली खर्च | : | रु. [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] |
| | इ) योजनेचा दरमाणशी खर्च विहित निकषात आहे काय ? | : | होय / नाही |
| | फ) नसल्यास, अतिरिक्त दरमाणशी खर्चाच्या समर्थनार्थ कारणे द्यावी. | : | ------------------------------ |
| १५ | अ) प्रस्तावित योजनेस ग्रामसभेची मान्यता घेण्यात आली आहे काय ? | : | होय / नाही |
| | ब) असल्यास, ग्रामसभेच्या बैठकीचा ठराव क्र. व दिनांक | : | ठराव क्रमांक : [ ][ ][ ]<br>दिनांक [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ] |
| १६ | प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे कोणी तयार केले आहेत ? त्याचा हुद्दा (असल्यास) व पत्ता द्यावा. | : | जिल्हा परिषदे मधील अभियंता/महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंता/ग्रामपंचायतीने खाजगी अभियंत्याकडून तयार करुन घेतले आहेत/ अन्य ------ |
| १७ | अ) प्रस्तावित योजनेचे अंदाज व आराखडे जिल्हा दर सूची (DSR) आधार धरुन तयार केले आहेत अथवा बाजारभाव विचारात घेऊन तयार केले आहेत अथवा अन्य पध्दतीने तयार केले आहेत ? (तपशील द्यावा). | : | जिल्हा दरसूचीनुसार/बाजार भावानुसार/इतर (इतर पध्दतीचा तपशील द्यावा) |
| | ब) प्रस्तावित योजनेत घ्यावयाच्या कामांचा आवश्यक तपशील सोबत जोडला आहे का ? | : | होय / नाही<br>(असल्यास, तपशील स्वतंत्रपणे या तपासणी सूचीस जोडावा) |

१८ प्रस्तावित योजनेची कामे कोणत्या पध्दतीने करण्यात येणार आहेत ? :

अ) स्वत: ग्रामपंचायतीमार्फत (डीपार्टमेंटल)

(i) तंत्रज्ञ नेमून - होय नाही

(ii) माल खरेदी करुन- होय नाही

(iii) मजूर लावून - होय नाही

ब) खुल्या निविदाद्वारे संपूर्ण केंत्राट देऊन : होय नाही

क) काही कामे खुल्या निविदा व काही कामे डिपार्टमेंटल :

(क चा तपशील स्वतंत्रपणे जोडावा)

## भाग-पाच : लोकवर्गणी :-

१९) अ) निकषानुसार देय लोकवर्गणीची एकूण रक्कम : रुपये ☐☐☐☐☐☐☐☐
(अक्षरी रु.............................................)

ब)लोकवर्गणीची जमा करण्यात आलेली एकूण रक्कम : रुपये ☐☐☐☐☐☐☐☐
(अक्षरी रु.................)

२०) अ) वरील लोकवर्गणीची रक्कम गावातील किती कुटुंबांकडून जमा करण्यात आली आहे ? ☐☐☐☐☐ (कुटुंबे)

ब) सर्व वर्गणीदारांना पावत्या देण्यात आल्या आहेत काय ? (पावतीचा नमुना सोबत जोडावा) होय नाही

क) या तपासणी सूचीत सोबत जोडलेल्या **जोडपत्र-१** मधील माहिती उपलब्ध करुन दिली आहे काय ? होय नाही

२१) अ) लोकवर्गणीची संपूर्ण रक्कम स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यात आली आहे काय ? : होय नाही

ब) i) बँक खाते क्रमांक ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ii) बँकेचे नांव : ____________________

iii) बँक शाखेचे नाव व कोड नं. : ____________________

कोड नं. ☐☐☐☐☐☐

iv) बँकेत जमा केलेली रक्कम : रुपये ☐☐☐☐☐☐☐☐

क) बँक पासबुकाची झेरॉक्स सोबत जोडली आहे काय ? होय नाही

ड) बँक खाते चालविणा-या व्यक्तिची नांवे व पदे

१) नांव ------------------------------पद ---------------

२) नांव ------------------------------पद ---------------

## भाग - सहा प्रस्तावित योजनेची देखभाल

२२) अ) प्रस्तावित योजना पूर्ण होण्याचा अंदाजित दिनांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

ब) योजना पूर्ण झाल्यावर तिच्यावर अपेक्षित वार्षिक देखभालीचा खर्च : रु. ☐☐☐☐☐☐☐☐

क) योजना पूर्ण होण्याच्या वेळी अपेक्षीत लोकसंख्या / कुटुंबांची संख्या : लोकसंख्या ☐☐☐☐☐☐☐

☐☐☐☐☐☐ कुटुंबे

ड) प्रस्तावित पाणी पट्टीचा वार्षिक दर ( जुन्या योजनांवरील खर्च धरुन) : रु. ☐☐☐☐☐☐☐☐

इ) त्यातून वार्षिक अपेक्षित मागणी रु. ☐☐☐☐☐☐☐☐

फ) i) वसुलीची अपेक्षित टक्केवारी : ☐☐ • ☐☐ %

ii) एकुण अपेक्षित प्रत्यक्ष वसुली : रु. ☐☐☐☐☐☐☐☐

## भाग-सात : सत्यतेचे प्रमाणपत्र :

प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तावित योजनेसाठी लोकवर्गणीची रक्कम गावातील/वाडीतील संबंधित लाभार्थी कुटुंबाकडून जमा करुन ती ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या स्वतंत्र बँक खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. लोकवर्गणीची सदर रक्कम इतर कोणत्याही स्त्रोतातून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जमा करण्यात आलेली नाही. वरील माहितीपैकी काही / सर्व माहिती चुकीची / दिशाभूल करणारी असल्याचे आढळून आल्यास, योजनेसाठी मिळालेला शासकीय निधी रद्द होऊ शकतो / परत बोलाविता येऊ शकतो याची आम्हाला कल्पना असून, त्यास आमची संमती आहे.

सरपंच
ग्रामपंचायत--------------
( नांव ...........................)
.......................................................................)

अध्यक्ष
ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती----------
( नांव

ग्रामसेवक
ग्रामपंचायत--------------
( नांव ...........................)

सर्व सदस्य
ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती----------

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |
| ५) | | |
| ६) | | |
| ७) | | |
| ८) | | |

ठिकाण :

दिनांक :

## जोडपत्र-१

## ग्रामीण पाणी पुरवठा योजनेबाबतच्या तपासणी सूचीसोबतचे जोडपत्र

| अ. क्र. | कुटुंब प्रमुखाचे नांव | कुटुंबातील सदस्यांची संख्या | लोकवर्गणीची रक्कम | पावती क्रमांक व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३ | ४. | ५. | ६. |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |